**श्री. लिलाधर बाळाराम गोयजी वगैरे विरुध्द श्री. चिंतामणी भिकू गोयजी वगैरे**

## नि.क्र. १२ वर आदेश

१. प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी प्रतिवादीं विरोधात झालेली एकतर्फी हुकूमाचा आदेश रद्द होणेकरीता प्रस्तूतचा अर्ज केला आहे. प्रस्तूत अर्जावर वादी यांनी म्हणणे देऊन अर्जास विरोध केला आहे.

२. प्रतिवादी कथन करतात की, दि. २१.०८.२०१९ रोजी एकतर्फी आदेश पारीत झाला आहे. नोटीसची बजावणी होवून देखील प्रतिवादी कोर्टात हजर न झाल्याने एकतर्फी आदेश पारीत झाला आहे. प्रतिवादींना नोटीस लागल्यानंतर दिनांक २६.११.२०१८ रोजी वादी व प्रतिवादी यांचे नातेवाईक तुलसीबाई गोविंद गोयजी या मयत झाल्या होत्या. त्यामुळे मध्यंतरीच्या काळात प्रतिवादींना कोर्टात हजर राहता आले नाही. प्रतिवादी क्र. १ वयोवृध्द असल्याने व आजाराने पिडीत असल्याने गेले एक वर्षे अंधरुणाला खिळून आहेत. वैद्यकिय प्रमाणपत्र अर्जासोबत दाखल केले आहे. प्रतिवादी क्र.३ यांची डोळयाची शस्त्रक्रीया झाली आहे. त्यांना घराबाहेर जाण्यास मनाई केली होती. प्रतिवादी क्र. २ शासकीय कर्मचारी असल्याने त्यांना कोर्टात दिलेल्या तारखांना हजर राहणे शक्य झाले नाही. त्यानंतर फेब्रुवारी १९ ते ऑगस्ट १९ पर्यंत पिठासन अधिकारी रजेवर असल्याने कोणत्या कोर्टात हजर राहावे याबाबत योग्य सल्ला मिळाला नाही. ऑगस्ट २०१९ पासून मुरुड कोर्टामध्ये इन्चार्ज न्यायाधीश असल्याची कल्पना वादी अथवा इतर कोणाकडून मिळाली नाही.

३. प्रतिवादी पुढे कथन करतात की, त्यांचे विरोधात पारीत केलेला एकतर्फी आदेश रद्द न केल्यास प्रतिवादी यांना मे. कोर्टात हजर होवून दाव्याकामी म्हणणे दाखल करता येणार नाही. यामुळे प्रतिवादी यांना सदरचा दावा चालविणे अशक्य होणार असून प्रतिवादींवर एकप्रकारे अन्याय होणार आहे व त्यामुळे प्रतिवादी यांचे कधीही पैशाच्या स्वरुपात न भरुन येणारे असे अपरिमीत नुकसान

होणार आहे.

४. सदर अर्जास वादीने म्हणणे दाखल करुन हरकत घेतली आहे. वादी कथन करतात की, प्रतिवादींना समन्स लागून बराच कालावधी झालेला आहे. अर्ज नमुद कारणे व त्या संदर्भात दाखल केलेली कागदपत्रे सदर अर्जास पुष्टी देत नाहीत. मे. कोर्टाने एकतर्फी हुकूम केल्यानंतर वादीने कोर्टकमिशनरचा अर्ज दिलेला आहे. त्यामुळे बराच कालावधी होवून गेलेला आहे. म्हणून सदर अर्जास वादींची हरकत आहे. जर सदरचा अर्ज मंजूर केल्यास जास्तीत जास्त खर्चाची रक्कम आकारण्यात यावी अशी विनंती वादीने केली आहे.

५. दावा अतिक्रमण दूर करुन मिळणेकरीता आहे. दोन्ही पक्षाचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले. दाव्याचे स्वरुप आणि दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले. प्रतिवादी क्र. १ व ३ यांना दाव्याच्या समन्सची बजावणी दिनांक १९.११.२०१८ रोजी व प्रतिवादी क्र. २ यांना दाव्याच्या समन्सची बजावणी दिनांक २२.११.२०१८ रोजी झाल्याबाबतचा बेलिफ रिपोर्ट आहे. दिनांक २१.०८.२०१९ रोजी निशाणी १ वर एकतर्फी आदेश पारीत करणेत आला. प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी प्रस्तुतचा अर्ज दिनांक १८.१२.२०१९ रोजी दिला आहे.

६. प्रतिवादी क्र. १ व ३ यांचे वैद्यकिय दाखले दाखल केले आहेत. प्रतिवादी क्र. २ यांचे सेवानिवृत्तीचे आदेश व प्रमाणपत्र दाखल केले आहे. प्रतिवादी क्र. २ यांचे डोळयांची शस्त्रक्रिया दिनांक ७.१२.२०१८ रोजी झाल्याचे वैद्यकिय प्रमाणपत्रामध्ये नमुद आहे. प्रतिवादी क्र. ३ यांना समन्सची बजावणी दिनांक १९.११.२०१८ रोजी झालेली आहे. प्रतिवादी क्र. ३ हे दाखल कागदपत्रान्वये दिनांक ३१.०५.२०१९ रोजी सेवानिवृत्त झाले आहेत. प्रतिवादी क्र. ३ यांना समन्स बजावणी दिनांक २२.११.२०१८ रोजी झाली आहे. प्रतिवादी क्र. २ यांना समन्स लागल्यानंतर शस्त्रक्रियेपुर्वी हजर होता आले असते, अथवा वैद्यकिय अधिकारी यांनी सांगितल्याप्रमाणे ४० दिवस आराम करुन पुढे हजर होणे शक्य होते. प्रतिवादी क्र. ३ हे शासकिय सेवेत असल्याने कोर्टाच्या तारखेस हजर राहणे

शक्य झाले नाही, हे कारण होवू शकत नाही. दिनांक ३१.०५.२०१९ रोजी सेवानिवृत्त झाले नंतर प्रतिवादी क्र. ३ यांना दाव्याकामी हजर होणे शक्या होते. सेवानिवृत्ती नंतर दाव्याचे कामकाज पाहता आले असते.

७. पिठासन अधिकारी नियमानुसार त्यांचे हक्काचे रजेवर वरिष्ठांच्या परवानगीने होते. पिठासन अधिकारी नसतांना कोर्ट कामकाज कधीही बंद नव्हते. मा. प्रभारी अधिकारी कामकाज पाहत असतात. पिठासन अधिकारी रजेवर गेल्यानंतर मुरुड कोर्टाचा प्रभार अलिबाग येथील मा. प्रभारी अधिका-यांकडे चालू होता, तद्नंतर जुलै ते ऑक्टोबर पूर्णवेळ मुरुड कोर्टामध्ये न्यायिक अधिकारी कामकाज पहात होते. सदर बाब माहित नाही या म्हणण्यात मला कोणतेही तथ्य आढळत नाही. प्रतिवादी क्र. ३ यांना समन्स बजावणी दिनांक १९.११.२०१८ रोजी झालेली आहे. तद्नंतर दिनांक ३१.०५.२०१९ रोजी प्रतिवादी क्र. ३ सेवानिवृत्त झाल्याचे त्यांनी दाखल केलेल्या कागदपत्रांतून दिसते. सेवानिवृत्तीनंतर कोर्टात हजर होणे शक्य होते. कोर्ट रजेवर होते म्हणून दाव्याकामी हजर होता आले नाही हे कथन असंयुक्तीक व तथ्यहिन आहे. प्रतिवादी क्र. ३ शासकीय सेवेत कामकाज करत होते म्हणजेच सुशिक्षीत लिहीता वाचता येणारे होते.

८. प्रतिवादी क्र.१ ते ३ यांचे विरुध्द एकतर्फा आदेश दिनांक २१.०८.२०१९ रोजी पारीत झालेला आहे. दिनांक २१.०८.२०१९ रोजीपर्यंत पुरेशी संधी दिलेली आहे. प्रतिवादीं विरुध्द कोणताही तडकाफडकी एकतर्फा आदेश पारीत झालेला नाही. समन्स बजावणी झाल्यापासून प्रतिवादी यांना त्यांचेविरुध्द मुरुड न्यायालयामध्ये दावा चालू असल्याची परिपूर्ण माहिती होती. समन्स बजावणी झाल्यानंतर साधारण एक वर्षानंतर प्रस्तुत अर्ज प्रतिवादी यांनी दाखल केलेला आहे.

९. दावा अतिक्रमणाचा आहे. सद्यस्थितीत दाव्यामध्ये वादीने कोर्ट

कमिशन अर्ज दाखल केला आहे. न्यायाच्या दृष्टीने दावा गुणदोषांवर चालणे क्रमप्राप्त आहे. प्रत्येकास स्वत:ची बाजू मांडण्याचा पूर्ण अधिकार आहे. तसेच स्वत:ची बाजू मांडण्यास संधी देणे नैसर्गिक न्यायतत्वांन्वये योग्य व न्यायिक आहे. दाव्याचे स्वरुप, कायदा व वस्तूस्थितीचे मुद्दे पाहता केवळ तांत्रिक बाबीकडे न पाहता, संपरिक्षा न्यायालयामध्ये प्रतिवादींना न्यायाच्या दृष्टीने एक संधी देणे मला न्यायोचीत वाटत आहे. प्रतिवादी क्र. १ यांचे वैद्यकिय प्रमाणपत्रानुसार ते अंथरुणास खिळून आहेत असे नमुद आहे. प्रतिवादी क्र. १ व ३ हे मौजे मजगांव, ता. मुरुड येथील रहिवासी आहेत. प्रतिवादी क्र. ३ यांना मौजे मजगांव हे मुरुडच्या अतिशय जवळ असल्याने न्यायालयीन कामकाज पाहणे सहज शक्य आहे. न्यायालयीन कामकाज चालू असल्याबाबत न्यायालयीन कर्मचा-यांकडून रितसर माहिती उपलब्ध होत असते. प्रतिवादी यांनी नोटीस बजावणी झाल्यानंतर प्रत्यक्ष न्यायालयात उपस्थित राहून विचारणा करुन त्या अनुषंगाने योग्य त्या पुर्तता करणे सहज शक्य होते.

१०. वरील सर्व कारणमिमांसा, दाव्याचे स्वरुप पाहता प्रतिवादीं विरुध्द झालेला एकतर्फा आदेश रद्द करुन दाव्याकामी हजर होण्याची परवानगी देणे मला अंतिम न्यायाच्या दृष्टीने योग्य वाटत आहे.

११. प्रतिवादी क्र. १ ते ३ विरुध्द झालेला एकतर्फा आदेश प्रथमत: बाजूस होवून त्यांना दाव्यात प्रथम सामाविष्ठ होणे दिवाणी प्रक्रीया संहिता तरतुदी अन्वये क्रमप्राप्त आहे. तद्नंतर कैफियत/प्रतिदावा याकरीता स्वतंत्र अर्जाने प्रतिवादी यांनी येणे हे तरतुदी अन्वये व नियमित कार्यप्रणाली अन्वये अपेक्षित आहे. तथापि, प्रतिवादी यांनी प्रस्तुत अर्जामध्ये शेवटी कैफियत व प्रतिदावा फैलावर घेण्याची विनंती केली आहे. कायदेशीर तरतुदी अन्वये समन्स लागल्यापासून ठराविक कालावधी मध्ये कैफियत देणे बंधनकारक आहे. सदर बाबत स्वतंत्र अर्ज असणे बंधनकारक आहे. सदर बाबत प्रस्तुत अर्जामध्ये यत्किंचितही उल्लेख नाही.

१२. तथापि, वर नमुद केल्यान्वये दाव्यामध्ये समाविष्ठ होण्याची प्रतिवादी क्र. १ ते ३ यांना संधी देत आहे. सदर आदेश हा प्रतिवादी क्र. १ ते ३ विरुध्द झालेला एकतर्फा आदेश बाजूस सारणे या कारणापूर्ताच मर्यादित आहे. सबब न्यायाचे दृष्टीने मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. निशाणी १२ अंशतः मंजूर करणेत येतो.

२. प्रस्तूत अर्ज रक्कम रुपये ५०००/- खर्च भरण्याच्या अटीवर मंजूर करुन दिनांक २१.०८.२०१९ रोजी प्रतिवादी क्र. १ ते ३ विरुध्द झालेला एकतर्फी आदेश बाजूस सारणेत येतो.

३. खर्च रक्कम रुपये ५०००/- वादीस देणेत यावे.

मुरुड,
दिनांक : २८.०१.२०२१

(एम.ए.के. शेख)
दिवाणी न्यायाधीश.क.स्तर,मुरुड